# नॅशनल बल्क हँडलिंग असोसिएशनच्या अध्यक्षपदी डॉ. विजय केळकर



**मुंबई:** कृषी क्षेत्रासाठी साठवण व गोदामांची सेवा देणारी देशातील सर्वात मोठी खाजगी कंपनी असलेल्या नॅशनल बल्क हँडलिंग असोसिएशन (एनबीएचसी)ने विख्यात अर्थतज्ज्ञ डॉ. विजय केळकर यांची स्वतंत्र संचालक आणि अध्यक्ष म्हणून नेमणूक करून आपले मंडळ अधिक सक्षम केले आहे. कंपनीने यापूर्वी वित्त मंत्रालयातील आर्थिक सल्लागार म्हणून काम केलेल्या डॉ. अजय एन. शहा यांची स्वतंत्र संचालक म्हणून नियुक्ती केली आहे.

या नियुक्त्यांबद्दल बोलताना व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल चौधरी म्हणाले, ''या दोन प्रख्यात व्यक्तींच्या नियुक्त्यांमुळे आमच्या मंडळाला या व्यक्तींच्या अनुभवाचा व तज्ज्ञतेचा फायदा होईल आणि फक्त कंपनीबद्दलच नव्हे, तर संपूर्ण शेतकी-पुरवठा शृंखलेमधील विश्वासार्हता द्विगुणित होण्यात मदत होईल.''

डॉ. केळकर म्हणाले की, भारताने शेतकी क्षेत्रात अजून भरीव कामगिरी करून दाखवण्याची आणि शेतकी मूल्य शृंखलेमध्ये सक्षम संस्थांची उभारणी करण्याची गरज आहे. एनबीएचसी हे ॲग्री-वेअरहाऊसिंग क्षेत्रामधील नामवंत नाव आहे आणि बाजारातील संधींचा लाभ घेण्याकरिता ते सुसज्ज आहेत.